Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Aurangabad – 431 004, Maharashtra, India
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

* परिपत्रक *

संदर्भ : १) शैक्षणिक शुल्क माफीबाबत विद्यापीठ अधिसभेने दि. ०८-१०-२०२१ रोजी घेतलेला निर्णय.

मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार या परिपत्रकाद्वारे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व संलग्नीत महाविद्यालये, विद्यापीठ विभाग, मुख्य परिसर व उपपरिसर यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व जिल्हयांमध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे ओला दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे तद्अनुषंगाने विद्यापीठ अधिसभेमध्ये दिनांक ०८-१०-२०२१ रोजी झालेल्या सविस्तर चर्चेनुसार मा. कुलगुरु महोदयांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करिता प्रवेशित विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क माफ करणे बाबत खालीलप्रमाणे विनर्दिष्टित केल्यानुसार निर्णय घेण्यात आलेला आहे.

१) प्रस्तुत प्रकरणी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व जिल्हयांमध्ये ओला दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे अध्यादेश-०१ अन्वये विहित करण्यात आलेल्या विविध शुल्कापैकी फक्त शैक्षणिक शुल्क माफ करण्यात आलेले असून प्रवेशित विद्यार्थ्यांना राज्य व केंद्र शासन तसेच इतर तत्सम प्राधीकरणाने शिष्यवृत्तीच्या माध्यमातून मंजूर करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीधारक लाभार्थी विद्यार्थी वगळून इतर उर्वरित विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करिता शैक्षणिक शुल्क माफ करण्यात आलेले असल्यामुळे सदरील आर्थिक भार संलग्नीत महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने संस्थेच्या एकत्रित निधीतून करणेबाबत विद्यापीठ स्तरावरुन आवाहन / सुचित करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत प्रकरणी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व जिल्हयांमध्ये ओला दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे अध्यादेश-०१ अन्वये विहित करण्यात आलेल्या विविध शुल्कापैकी फक्त शैक्षणिक शुल्क माफ करण्यात आलेले असून प्रवेशित विद्यार्थ्यांना राज्य व केंद्र शासन तसेच इतर तत्सम प्राधीकरणाने शिष्यवृत्तीच्या माध्यमातून मंजूर करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीधारक लाभार्थी विद्यार्थी वगळून इतर उर्वरित विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करिता शैक्षणिक शुल्क माफ करण्यात आलेले असल्यामुळे सदरील आर्थिक भार विद्यापीठाच्या एकत्रित निधीतून करणेबाबत लेखा विभागाने आपल्या स्तरावरुन यथायोग्य कार्यवाही करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व जिल्हयामध्ये ओला दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून सदरील शुल्क माफीबाबतचा निर्णय फक्त शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करिता लागू राहील, याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.

][

][

=A=

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

संदर्भ क्र. शैक्ष/ संलग्न/ अभ्यासक्रम/एआरडब्ल्यु/ २०२०-२१/
दिनांक :- २८ ऑक्टोबर, २०२१. 13052

प्रतिलिपी :-

१) **मा. कुलगुरु महोदयांचे स्वीय सहाय्यक,** कुलगुरु कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
२) **मा. प्र कुलगुरु महोदयांचे स्वीय सहाय्यक,** प्र कुलगुरु कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
३) **मा. सदस्य,** (सर्व), अधिसभा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
४) **मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
५) **मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
६) **अधिक्षक,** पात्रता विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
७) **अध्यक्ष / सचिव,** सर्व संलग्नीत महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
८) **प्राचार्य / संचालक,** सर्व संलग्नीत महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
९) **व्यवस्थापकिय संचालक,** महाराष्ट्र ज्ञान मंडळ मर्या, (MKCL) आय.सी.सी. ट्रेड टावर, ५ वा मजला, ए विंग सेनापती बापट मार्ग, पुणे.
१०) **जनसंपर्क अधिकारी,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
११) **संचालक,** युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देवून विनंती करण्यात येते की, सर्व संलग्नीत महाविद्यालयाच्या ई-पत्त्यावर व विद्यापीठ संकेतस्थळाच्या परिपत्रक विभागात प्रसिध्द करण्यात यावे, हि विनंती.